राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र. ५/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २७ जानेवारी, २००५.

## आ दे श

भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ के व अनुच्छेद २४३ झेडए अनुसार सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पाडण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर टाकलेली आहे. निवडणुकीच्या प्रक्रियेमध्ये मतदार संघ तयार करणे, मतदार यादी तयार करणे व प्रत्यक्ष निवडणुका घेणे या बाबी समाविष्ट होतात.

२. निवडणुकांसाठी मतदार संघ तयार करताना अडचणी येऊ नयेत व एकसूत्रीपणा राहावा या दृष्टीकोनातून भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३के व २४३झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम (सन १८८८ चा मुंबई नियम क्रमांक-३) चे कलम ५, १८अ(४), कलम १९(१), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (सन १९५० चा मध्यप्रांत व व-हाड अधिनियम क्रमांक-२) चे कलम ९ व कलम ९ ब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक-५९) चे कलम ५ व कलम १४(४) व महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५(१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-४०), चे कलम १० व कलम १०अ(४) तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा अधिनियम, १९६१ चे कलम ९अ व १२ मधील व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १० नुसार मी नन्द लाल, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक साधारणपणे केंधी होणार हे पूर्वीपासूनच माहित असते. निवडणुकीची तयारी प्रत्यक्ष मतदानाच्या दिवसाच्या किमान ६ महिने आधीपासून सुरु होते. या प्रक्रियेत स्थानिक स्वराज्य संस्थांचे मतदार संघांमध्ये विभाजन करणे ही प्रक्रिया अतिशय महत्वाची आहे. या प्रक्रियेत कोणत्याही अडचणी येऊ नयेत यासाठी निवडणुका किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत ज्या महिन्यात संपत असेल त्या महिन्यांच्या सहा महिने आधीपासून कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हदीमध्ये परिवर्तन करण्यात येऊ नये. हद्दवाढ

करण्याच्या प्रत्येक प्रस्तावाच्या आधी राज्य निवडणूक आयोगाकडून त्या स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत कधी संपणार आहे व हद्दवाढीसंबंधीचा प्रस्ताव तयार करण्यास कोणतीही अडचण येणार नाही, याची राज्य निवडणूक आयोगाकडून माहिती करुन घ्यावी.

( नन्द लाल )
**राज्य निवडणूक आयुक्त,**
**महाराष्ट्र**

प्रति,
१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सर्व महानगरपालिका आयुक्त,
५. सर्व विभागीय आयुक्त,
६. सर्व जिल्हाधिकारी,
७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
८. सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
९. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
१०. निवड नस्ती